IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचा इतिहास एक चिकित्सक अभ्यास.

**डॉ. रविंद्र बाबुराव जाधव**
इतिहास विभाग
श्रीमती इंदिरा महादेव बेहरे कला, श्रीमान चंदुलाल सेठ वाणिज्य व श्रीमंती शोभनाताई चंदुलाल सेठ विज्ञान महाविद्यालय, खेड, रत्नागिरी
ravindrajadhav7751@gmail.com

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र सामाजिक सुधारण्याची प्रयोगशाळा म्हणून ओळख आहे. या महाराष्ट्रात अनेक सामाजिक सुधारक होउन गेले. त्यांनी महाराष्ट्राला एक तात्विक बैठक दिली .स्वतःच्या विचाराने कर्तत्वाने नवीन महाराष्ट्र घडवला .समाज सुधारकांनी मौलिक योगदान दिले .समाज सुधारकांनी या समाज व्यवस्थेला अंध पथनाकडून प्रगतीकडे नेण्याचे कार्य केले. समाज व्यवस्थेला एक आयाम प्रस्थापित केले .समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणले .या समाजसुधारकांचा कोणा एका व्यक्तीविरुद्ध संघर्ष नव्हता किंवा कोणा जातीविरुद्ध संघर्ष नव्हता हा संघर्ष होता विचारसरणी, अंधश्रद्धेच्या, चालीरीतीच्या विरुद्ध होता .महिला ,शूद्र, आणि अंती शूद्र समाज, दलित समाज यांच्या न्याय हक्कासाठी होतो .समाजसुधारकांनी आपलं संपूर्ण आयुष्य समाज सुधारणा साठी दिलं. समाज व्यवस्थेतील त्यांचे अधिकार त्यांना मिळून दिलं समान समाज रचना निर्माण केली .

**1) सती प्रथा:-**

भारतात हिंदू समाजात एखाद्या स्त्रीचा पतीचा मृत्यू झाल्यानंतर त्या स्त्रीला जिवंत पतीच्या अंत्यसंस्काराच्या वेळी पतीच्या चितेवर जिवंत जाळले जात .या प्रथे विरुद्ध राजाराम मोहन रॉय यांनी या अन्यायकारक प्रथेविरुद्ध आवाज उठवला .ही प्रथा बंद व्हावी यासाठी सभा, चर्चा घडवून आणली समाज व्यवस्थेच्या विचारसरणीमध्ये बदल व्हावा यासाठी सतत प्रयत्न केले. इंग्रज प्रशासनातील अधिकारी लॉर्ड बेटिंग यांनी 4 डिसेंबर 1829 साली कायदा संमत करून ही सती प्रथा बंद केली.

**2) केशवपन:-**

भारतातील विधवा स्त्रियांच्या डोक्यावरील सर्व केस काढण्याची प्रथा प्रचलित होती. या प्रथे ला समाजसुधारकांनी विरोध केला .ही प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यातील नाभिकांना मार्गदर्शन केले आणि पुण्यातील नाभिकाने केशवपन न करण्याचा निर्णय पुण्यातील नाभिकाने घेतला .पुण्याप्रमाणेच मुंबईत देखील संप केला .दिनबंधू ,इंदू, प्रकाश ,सुबोध पत्रिका या सर्वांनी केशवपन बंद व्हावा या बाजूने लिखाण केले. समाज व्यवस्थेत लोकमत तयार केले .लोक जागृती महात्मा ज्योतिबा फुले यांनी यशस्वी केली आणि ही प्रथा बंद झाली.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**3) बालविवाहः-**

बालविवाह पद्धत समाज व्यवस्थेमध्ये रूढ झाली होती कमी वयात लहान मुलीचे विवाह लावले जात होते पण बाल विवाह पेक्षा बाल विधवा चे प्रमाण सर्वात जास्त होते .या काळातील मुलीचे आयुष्य चार भिंतीत होते चूल आणि मूल एवढेच वलय स्त्री जीवनाभोवती होतं .या मुलींना स्वतःचा पती निवडण्याचा अधिकार देखील नव्हता या प्रथा बंद करण्यासाठी समाज सुधारकांनी मोलाचे योगदान दिले.

इंग्रज प्रशासन अधिकारी लॉर्ड रिपन यांना बेहरामजी मलबारी यांनी समाजातील बालविवाह होणे थांबवावे यासाठी निवेदन दिले होते .काँग्रेसने देखील बालविवाह प्रथा थांबवण्यासाठी कायदा व्हावा अशी विनंती केली .न्यायमूर्ती रानडे, आगरकर, डॉ. भांडवलकर यांनी सामाजिक परिषदेच्या माध्यमातून प्रशासनाकडे मागणी केली .भारतीय समाज सुधारकाचा एक दबाव प्रशासना वर निर्माण झाला आणि समाज सुधारकांच्या मागणी अनुसार संमती वयाचा कायदा प्रशासनाने तयार केला.

**4) बालहत्या प्रतिबंध ग्रहः-**

बालहत्या प्रतिबंध ग्रहाची निर्मिती महात्मा ज्योतिबा फुले यांनी केली. काशीबाई या विधवा महिलेचा मुलगा महात्मा ज्योतिबा फुले यांनी दत्तक घेतला होता. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वतःच्या कार्याने इतिहासाला नोंद घ्यायला लावलं समाज व्यवस्थेचे बहुजन समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढील काळात न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी यांनी अनाथ बालाश्रम सुरू केले .पुण्यात पंडिता रमाबाई यांनी शारदा सदन च्या माध्यमातून विधवा स्त्रियांना आश्रय दिला महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी अनाथ बालिकाश्रम मंडळ सुरू केले. या समाज सुधारकांच्या कार्य आणि कृतीमुळे समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आले.

**5) विधवा पुनर्विवाहः-**

विधवा महिलेचे पुनर्विवाह यासाठी अनेक समाजसुधारकांनी सभा ,व्याख्यान ,चर्चा, मार्गदर्शन ,वर्तमानपत्रातून अनुकूल लिखाण विचार ने परिवर्तन घडवून आणणारे लेखन करून विधवा विवाह चळवळीला सुरुवात झाली. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी ,विष्णुशास्त्री पंडित यांनी ही चळवळ सुरू केली. ब्रिटिश प्रशासनाने विधवा पुनर्विवाह करण्याचा कायदा तयार करण्यात आला .समाज व्यवस्थेच्या विचारसरणीमध्ये बदल होऊन विधवा महिलेचे पुनर्विवाह होऊ लागले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी विधवा महिलेचे पुनर्विवाह घडून आणले.

**6) शिक्षण क्षेत्रातील समाजसुधारकांचे कार्यः-**

भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे. या पुरुषप्रधान संस्कृतीने महिलांना दुय्यम स्थान दिले. महिला या समाज व्यवस्थेत अनेक गोष्टी पासून वंचित असाह्य राहिल्या महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिलांना त्यांचे शिक्षणाचे हक्क मिळावे यासाठी शाळा सुरू केल्या. स्वतःची पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून महाराष्ट्रातील

पहिल्या शिक्षिका म्हणून त्यांचा गुणगौरव केला .जातो तिथूनच महिला शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले .त्याचप्रमाणे अस्पृश्य जातीतील मुलींना देखील शिक्षण मिळायला पाहिजे या हेतूने अस्पृश्य जाती साठी दोन शाळा त्यांनी काढल्या. महार मांग लोकांसाठी विद्या शिकवण्यासाठी मंडळी नावाचे संस्था काढली. सामाजिक कार्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केली .बहुजन समाजाला गुलामगिरीतून मुक्त करणे तसेच त्यांचे प्रगतीसाठी ही संस्था काढली.

राजेश्री शाहू महाराज यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्याचे कार्य केले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत त्यांनी दिलं मुलांना शाळेत पाठवणे हे बंधनकारक केलं. मुलांना वस्तीग्रह कोल्हापूर संस्थानात तयार केली गेली प्राथमिक शाळेपासून महाविद्यालय स्थापन केले .या शाळा महाविद्यालयाचा खर्च राजश्री शाहू महाराजांनी केला.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तरुणांना शिका संघटित व्हा संघर्ष करा हा संदेश त्यांनी दिला. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना त्यांनी केली .सिद्धार्थ कला विज्ञान विधी महाविद्यालय स्थापन केले तसेच औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना त्यांनी केली. सोलापूर येथे दलित विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू केल्या.

महर्षी कर्वे यांनी महिला विद्यापीठाची स्थापना केली .नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची स्थापना त्यांनी केली.

एक पाऊल प्रगती कडे पडले महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाचे बीजरोपण केले .पुढील काळात शिक्षणाचा वटवृक्ष झाला समाज परिवर्तन प्रगती या शिक्षणामुळे झाली.

**निष्कर्ष :-**

भारताची महिलांची परिस्थिती सुधारण्यामध्ये महाराष्ट्रीयन समाजसुधारकांचे मोलाची योगदान आहे. या समाजसुधारकांनी महिलांच्या न्याय हक्कासाठी कार्य केले आणि त्यांना त्यांच्या अधिकार मिळवून दिले .महिलांच्या जीवनाला एक आयाम प्रस्थापित करून दिले .या महिलांनी पुढील काळात या समाज व्यवस्थेत नेत्रदीप प्रगतीचा आलेख नमूद केला. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान संस्कृती या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळवून दिले प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत झाल्या महिलांचे एक पाऊल प्रगती कडे पडले. महिलांच्या जीवनाला कायद्याने संरक्षण दिले आहे .प्रगतशील महाराष्ट्र घडवण्यामध्ये महिलांचे योगदान आहे या समाजसुधारकांनी समाज व्यवस्थेला अंध पथनांकडून प्रगतीकडे नेण्याचे कार्य केले. महाराष्ट्राला एक तात्विक बैठक दिली. नवीन महाराष्ट्र घडवण्यामध्ये समाज सुधारकांचे मोलाचे योगदान आहे. या समाजसुधारकांनी समाज व्यवस्थेतील अंधश्रद्धा ,चालीरीती समाज व्यवस्थेची विचारसरणी बदलली संपूर्ण आयुष्य या समाजसुधारकांनी समाज व्यवस्था घडवण्यासाठी दिली. हाल अपेष्टा सहन करून ही समाजव्यवस्था तील परिवर्तन समाजसुधारकांनी घडवून आणले.

**संदर्भ ग्रंथः-**

1) History of Modern India (1757-1947)S.P.Nanda Dominant publishers and Distributors first Edition 2003

2) महाराष्ट्र तील लढे आणि लढवय्ये डॉ.माधव पोतदार अनुबंध प्रकाशन पुणे

3) भारत का इतिहास प्रागैतिहासिक कालसे आधुनिक काल तक मानिक लाल गुप्त एटलांटिक पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्यूटस 2003

4) आधुनिक भारत आचार्य शं.द. जावडेकर कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 1938

5) उत्तर कोकण दलित मुक्ती चळवळ परिवर्तनाचे संदर्भ 1900-1960 आत्माराम वाळींजेकर डिंपल पब्लिकेशन प्रथमावृत्ती 24 मार्च 2007